# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.01.2026** **वार:मंगळवार**

1. दावोस इथं जागतिक आर्थिक मंच परिषदेत पहिल्याच दिवशी राज्य सरकारचे साडेचौदा लाख कोटी रुपयांचे विक्रमी सामंजस्य करार
2. परदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे देशाचं प्रवेशद्वार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
3. पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला उत्साहात प्रारंभ आणि
4. राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या महापौरपदांच्या आरक्षणाची सोडत येत्या गुरुवारी.

**करार**

स्वित्झर्लंडमधील दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर विक्रमी साडेचौदा लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. गेल्या वर्षी दावोस शिखर परिषदेतील राज्याच्या एकूण गुंतवणूकीइतकी गुंतवणूक यावर्षी पहिल्याच दिवशी झाली आहे. या अंतर्गत स्वाक्षरी केलेल्या 19 सामंजस्य करारांमुळे विविध क्षेत्रांमध्ये 15 लाखांहून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होण्याचा अंदाज आहे. हे करार राज्याच्या 'विकसित महाराष्ट्र 2047' व्हिजन आणि पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षी ध्येयाशी सुसंगत आहेत, असं राज्य सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**दावोस मुख्यमंत्री**

दरम्यान, 'देशात येणाऱ्या परदेशी गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे प्रवेशद्वार आहे', असं प्रतिपादन या परिषदेत महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. दावोस इथं आयोजित जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत उभारण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या दालनात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. 'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे; त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल', असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या आर्थिक परिषदेत कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं विविध कंपन्याबरोबर हजारो कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते. जागतिक आर्थिक मंच परिषदेला यंदा 3 हजारहून अधिक जागतिक नेते उपस्थित आहेत. जगातील सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताची भूमिका ठळकपणे मांडण्यासाठी केंद्र सरकारचे मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि शंभरहून अधिक भारतीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी या परिषदेत सहभागी झाले आहेत.

**सायकल स्पर्धा**

पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचं काल अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात उद्घाटन झालं. रस्त्याच्या दुतर्फा पुणेकरांनी केलेली गर्दी, ढोल ताशांचा गजर, तरुणाईने केलेला रॅम्प वॉक, 'इंदू' या पुणे ग्रँड टूरच्या बोधचिन्हाचे आकर्षक फलक.... असं वातावरण उद्घाटनाच्या वेळी होतं. पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हा परिषदेचे मुख्यं कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्य क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यावेळी उपस्थित होते.

येत्या 23 तारखेपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेसाठी शहरात दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी काल पुण्यातील वाहतुकीत बदल करण्यात आले होते. स्पर्धेचा पूर्वरंग असलेली साडेसात किलोमीटरची प्रोलॉग स्पर्धा काल झाली. आजपासून स्पर्धेचे टप्पे अधिक खडतर होणार आहेत. पुढच्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातल्या घाटमाथ्यावर, सह्याद्रीच्या अवघड वळणांवर ही स्पर्धा रंगणार आहे.

भारताचे दोन संघ यात सहभागी झाले आहेत; भारताच्या डेव्हलपमेंट टीमचा स्पर्धक सचिन देसाई याच्यापासून शर्यतीला सुरुवात झाली. या स्पर्धेत पिंपरी चिंचवडचा सूर्या थातू याला भारतीय संघात स्थान मिळालं आहे. या स्पर्धेविषयी त्याने आकाशवाणीशी संवाद साधला...

**तो खूप मोठा स्टेज आहे, आमच्यासाठी एव्हरी इंडियनसाठी एन स्पेशली माझ्यासाठी कारण की महाराष्ट्रामध्ये होतं आणि पुण्यामध्ये वी आर एक्साईटेड, पण थोडंसं प्रेशर आणि जास्त मोटिवेशन भेटते आहे. कारण की बाय हार्ट आम्हाला चांगलं करायचं आहे, खूप हार्ड आहे, कारण की ऑल ओव्हर द वर्ल्ड लोकं येतात आहे. अड आमची ट्रेनिंग आधीपासनंच सगळ्यांची थोडी थोडी पर्सनली चालू झाली होती बट देन टीमची पंचवीसपासनं वी केम टुगेदर इन पटियाला आणि तेव्हापासनं आम्ही ट्रेनिंग करतो आहे सगळे.**

**महापौर निश्चिती**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या महापौरपदांचं आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या गुरुवारी मंत्रालयात सोडत काढली जाणार आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढली जाईल. महापौर पदासाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर विविध महापालिकामधे महापौर निवडीची प्रक्रिया सुरू होईल. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये बहुतांश ठिकाणी भाजपसह महायुतीला मोठं यश मिळालं आहे.

**महापौर**

शिवसेना आणि भाजप हे मुंबई महानगरपालिकेत एकत्र निवडणूक लढले असून मुंबईत महायुतीचा महापौर होईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यासह महायुती म्हणून जिथे जिथे एकत्र निवडणूक लढलो त्याठिकाणी महायुतीचाच महापौर असेल, असंही त्यांनी सांगितलं.

**हिंद दी चादर-नांदेड**

श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेडमध्ये येत्या 24 आणि 25 जानेवारी 'हिंद दी चादर' हा भव्य कार्यक्रम होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध मंत्री, तसंच विविध राज्यांचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी काल लातूरमध्ये; तर रविवारी नांदेडमध्ये घेतला. हिंद दी चादर या कार्यक्रमाबाबत अधिक माहिती देताना पापळकर म्हणाले.....

**साधारणतः सात आठ ते दहा लाख लोकांचा समुदाय या ठिकाणी होईल अशी एक अंदाज आहे. त्याच्यासाठी प्रचार प्रसिद्धीचं काम चालू आहे. पंजाबमधून देखील मोठ्या प्रमाणामध्ये लोक येण्याची शक्यता आहे. इतरही राज्यामध्ये इतर ठिकाणी विखुरलेले जे काही समुदाय आहेत त्या सर्व समुदायांना गुरु तेग बहादूर यांच्या चर्णी त्यांना मस्तक टेकण्याची अनेक लोकांची इच्छा आहे, आणि त्या निमित्तानं या कार्यक्रमाला अनेक लोक येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कार्यक्रमासाठी प्रशासनाची महत्त्वाची आणि मोठी जबाबदारी हीच आहे की सर्व येणाऱ्या इतर ह्या समुदायामध्ये सेवा हा फार मोठा गुण त्याच्यामधला आहे आणि त्याच्यामुळे जेवढे सेवा देणारे सेवेकरी या ठिकाणी येतील त्या सर्व लोकांना त्यांचं त्यांना लंगर असू देत. आठ ते दहा लंगर या ठिकाणी राहणार आहेत. त्यांच्यासाठी वैद्यकीय**

**सुविधा उपलब्ध राहणार आहेत. त्यासाठी त्यांना जाण्या येण्याच्यासाठी त्यांच्यासाठी बसेसची व्यवस्था व्यवस्था उपलब्ध होणार आहे.**

**पुणे-पीएमसेतू**

'विकसित भारत' घडवण्यासाठी कुशल मनुष्यबळ देण्याच्या अनुषंगानं; 'पीएम सेतू' योजना मैलाचा दगड ठरेल, असं प्रतिपादन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबश्री मुखर्जी यांनी काल पुण्यात केलं. यशदा इथं 'पीएम सेतू' या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत उद्योग सल्लागार कार्यशाळेमध्ये मुखर्जी बोलत होत्या. राज्याच्या कौशल्य विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा या वेळी उपस्थित होत्या. देशभरातील आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केलं जात आहे; यात अद्ययावत तंत्रज्ञान आणि प्रशिक्षकांच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला जाईल असं मुखर्जी म्हणाल्या. उद्योगांनी प्रशिक्षणात सक्रीय भूमिका बजावावी, असं आवाहनही त्यांनी केलं. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण अधिक दर्जेदार करण्यासाठी यावेळी कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले. या कार्यशाळेत विविध क्षेत्रांतील 50हून अधिक नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला.

**जिप निवडणूक**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. रत्नागिरी जिल्ह्यात आत्तापर्यंत जिल्हा परिषदेसाठी 11, तर पंचायत समिती निवडणुकीसाठी 26 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सांगली जिल्हा परिषदेच्या 61 गट आणि पंचायत समितीच्या 122 गणांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या हालचालींना वेग आला असून भारतीय जनता पक्षाच्या वतीनं इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या गेल्या आहेत. कालपर्यंत 7 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. धाराशिवमध्ये जिल्हा परिषदेसाठी 27 तर पंचायत समितीसाठी 22 49 अर्ज दाखल झाले आहेत. उद्या अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे.

**अपघात-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव-मनमाड रस्त्यावर रविवारी मध्यरात्री झालेल्या अपघातात 4 जणांचा मृत्यू झाला तर 20 जण जखमी झाले. खासगी बस आणि पिक अप वाहनाची समोरासमोर धडक झाल्यानं हा अपघात घडला.

**निधन-अहिल्यानगर**

बालरंगभूमी परिषदेच्या अहिल्यानगर शाखेच्या संस्थापक अध्यक्ष उर्मिला लोटके यांचं काल अल्प आजाराने निधन झालं; त्या 47 वर्षांच्या होत्या. अहिल्यानगरमध्ये बालरंगभूमीच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं. राज्य नाट्य स्पर्धांमध्ये दिग्दर्शन, नाट्य समीक्षण आणि उत्कृष्ट नाट्यनिर्मितीची अनेक पारितोषिकं त्यांनी मिळवली होती.

**विजय हजारे चषक**

विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत विदर्भानं सौराष्ट्राचा 38 धावांनी पराभव करून इतिहास घडवला आहे. विदर्भानं पहिल्यांदाच हा चषक जिंकला आहे. आधी रणजी, नंतर इराणी चषक आणि आता विजय हजारे चषक जिंकल्यानं अतिशय आनंद झाल्याची भावना कप्तान हर्ष दुबे यांनं आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

**हवामान**

संपूर्ण राज्यात आज हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**